


# जरा याद करो कुर्बानी...

अभिजित खांडेकर,
सीसीआर, वृत्तपत्रविद्या व जनसंवादशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ



हजारो वर्षांपूर्वी गौतम बुद्धांनी जगाला अहिंसा व शांतीचा संदेश दिला. सव्वाशे वर्षांपूर्वी विवेकानंदांनी विश्वशांती आणि बंधुत्वासाठी जगाला पुढे येण्यासाठी आवाहन केले. महात्मा गांधींनी आपल्या विचारांतून व कृतीतून अहिंसेचा संदेश पूर्ण जगाला दिला. अहिंसेचा विश्वशांतीचा व बंधुत्वाचा विचार ज्या मातीमध्ये रुजला आणि तो पुढे जगभर पोहचला. त्याच भारतावर अनेक वेळा हिंसक हल्ले झाले. पूर्वी हे हल्ले वायव्य सरहद्दीकडे अनेक वेळा हिंसक टोळ्यांकडून होत होते. अलीकडेच त्याचे स्वरूप बदलून हे हल्ले दहशतवादी संघटनांकडून होत आहेत.

२६/११ ला मुंबईवर दहशतवाद्यांनी हल्ला केला आणि अख्खा देश संतापाने पेटून उठला. निष्पाप लोक, पोलिस कर्मचारी आणि सुरक्षा दलाच्या जवानांना प्राण गमवावा लागला ही मुख्य भावना या संतापात होती. ही तारीख भारताच्या विशेषता मुंबईच्या सुरक्षेला आव्हान देणारी तारीख म्हणून इतिहासात कुप्रसिद्ध झाली. एखादी घटना घडून काही वर्षे झाली की, ती विस्मरणात जाते. मात्र, ही घटना म्हणजे महाराष्ट्राच्या एकतेवरचा घाला होता. यासाठीच एकजुटीचा संदेश आणि बलिदान गेलेल्यांना आदरांजली असा संयुक्त कार्यक्रम म्हणून शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागातर्फे दरवर्षी कँडल मार्च आयोजित केला जातो. अतिशय भावपूर्ण अशा या कार्यक्रमाला कुलगुरुंसह सर्व वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित असतात. या कार्यक्रमाचा सर्व खर्च कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून होत असतो. यामागे एकच भावना आहे ती म्हणजे शहिदांप्रति असलेली सन्मानाची भावना.

हल्ल्याच्या घटनेला ११ वर्षे उलटली तरी आजही त्या घटनेशी संबंधित गोष्टी वाचताना अंगावर अक्षरशः काटा येतो. अंदाधुंद गोळीबार करणारे अतिरेकी जिवाच्या आकांताने सैरावैरा पळणारे नागरिक निष्पाप लोकांचे रस्त्यावर पडलेले मृतदेह ती दृश्य आजही काळजाचा थरकाप उडवतात. त्याचवेळी भेदरलेल्या मनाला साळसकर करकरे आणि कामटे यांच्या त्यागाची ज्योत निर्भयतेची आणि सुरक्षिततेची ऊब देऊन जाते. त्यांचे देशासाठीचे समर्पण हे येणाऱ्या पिढीला प्रेरणादायी आहे.

मुंबई हल्ल्यातील शहिदांच्या कार्यांची आठवण रहावी व अशा दहशतवादी हल्ला विरुद्ध लढण्यास बळ मिळावे यासाठी देशभर अनेक उपक्रम राबवले जातात त्या सारखाच एक प्रयत्न शिवाजी विद्यापीठामध्ये गेली सात वर्षे राबविला जात आहे. कँडल मार्चच्या स्वरुपात शहिदांना आदरांजली देण्यासाठी विद्यार्थ्यांनी वसतिगृहापासून ते विद्यापीठाच्या मुख्य इमारती पर्यंत फेरी काढली जाते.

केवळ २६/११ चा नाही तर देशासाठी प्राणांची आहुती देणारे सीमेवरील प्रत्येक जवान कर्तव्यदक्ष अधिकारी, निर्भीड पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी समाजातील लोकांनी भयमुक्त व्हावे यासाठी केलेल्या त्यागाची आठवण या माध्यमातून करण्यात येते. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपासून संशोधन करणारे विद्यार्थ्यांपर्यंत सर्वजण या ठिकाणी एकत्र जमतात. स्वतः कुलगुरू आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख, विद्यापीठातील कर्मचारी आवर्जून उपस्थित राहतात. मेणबत्त्यांच्या प्रकाशात शहिदांविषयीच्या अभिमानाने युवकांचे चेहरे उजळले जातात हा प्रकाश त्यांना भारताचे नागरिक म्हणून दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी मार्गदर्शक ठरतो.



मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यास ११ वर्षे पूर्ण झाली. देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईवर झालेल्या हल्ल्याने सारा देश हादरून गेला होता. ती असणारी दृश्ये अजूनही डोळ्यासमोर आल्यावर शहिदांचे असणारे बलिदान दिसते. 'एक आठवण त्यांची जे गेलेत कधी न परतण्यासाठी' त्यांच्याकडून आपण प्रेरणा घेणे हे खऱ्या अर्थाने त्यांच्या बलिदानाचे सार्थक होईल.

– निखिल गायकवाड



२६/११ च्या हल्ल्यात झालेल्या शहिदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कँडल मार्चचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते. या कँडल मार्चमध्ये अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी तरुण युवक सहभागी होते. विद्यार्थिनी वसतिगृहापासून ते मुख्य कार्यालय इमारतीपर्यंत निघालेल्या कँडल मार्च माझ्यासाठी रोमांचकारी ठरला. डॉ. निशा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कँडल मार्चचे आयोजन केले. २६/११ च्या कटू आठवणींना उजाळा तर दिलाच तसेच आम्हा तरुणांना यातून शहिदांच्या बलिदानातून प्रेरणाही मिळावी यासाठी हा कँडल मार्च उपयुक्त पडेल.

– सुधांशु कांबळे, नॅनो सायन्स विभाग

# विद्यापीठात आज जागतिक अपंगदिनानिमित्त कार्यक्रम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ समावेशी शिक्षण संशोधन केंद्र, यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलीटीज, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र, विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने मंगळवार (दि. ३) रोजी राजर्षी शाहू सभागृह येथे सकाळी ११ वाजता जागतिक अपंगदिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, चेतना अपंगमती विकास संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष पवन खेबूडकर प्रमुख पाहुणे असणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बाळासाहेब कामत, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# योग, निसर्गोपचार परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषदेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परिषदेचे उद्घाटन जागतिक कीर्तीचे योगसद्गुरु डॉ. कृष्णदेव गिरी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. दिलीप पाटील, न्युट्रिशनल कन्सल्टंट, डॉ. अश्विनी देशमुख, होलेस्टिकहेल्थ प्रॅक्टिशनर डॉ. अर्चना त्रिवेदी व आजीवन अध्ययन केंद्राच्या प्रभारी संचालक डॉ. सुमन बुवा उपस्थित होते.